B.K. BIRLA CENTRE FOR EDUCATION
SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS
A CBSE DAY-CUM-BOYS' RESIDENTIAL SCHOOL

# TERM-1 EXAMINATION (2025-26)

## MARATHI

Class : IX — Duration : 3 Hrs
Date : 03.09.2025 — Max. Marks : 80
Admission No.: — Roll No.:

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :**

1. कृपया नीट तपासून घ्या की या प्रश्नपत्रिकेत 8 प्रश्न आहेत.
2. प्रत्येक भागाची उत्तरे शक्य तितक्या प्रयत्नाने एकाच ठिकाणी क्रमाने लिहा.
3. उत्तर लिहिण्यापूर्वी प्रश्नाचा क्रमांक प्रश्नपत्रिकेनुसार नक्की लिहा.
4. प्रश्नांचे निर्देश काळजीपूर्वक अवश्य वाचा.

---

## विभाग (अ) वाचन व आकलन गुण (15)

**प्र 1 :– (आकलन ) अ: अपठित गद्यांश :–**

शहराच्या बाजूला एक जंगल होते. त्या जंगलात असंख्य झाडे होती. जमिनीशी मुळे घट्ट ठेवत आकाशाकडे झेपावणाऱ्या फांदया रूप दाखवत होत्या. पाऊस म्हणजे बरहाचा महिना! वेली,फुले,फांदया,आनंदसोहळा,साजरा करायची.असंख्य पक्षी आपला आनंद सोहळा साजरा करत. पक्ष्यांचे सुश्राव्य संगीत तेथे ऐकायला मिळे. जंगलात अनेक प्राणी होते पण मानवी वस्तीत ते येत नसत.शहराच्या रस्त्यावरून फिरणाऱ्या लोकांना हे जंगल कितीतरी ऊर्जा देत होते. हे जंगल या शहराचे वैभव,सौदर्य होते. अनमोल संपत्ती होती. संध्याकाळी मंद वाऱ्यावर अनेक फुंलांचा सुगंध रस्त्यावरील लोकांना वेड लावत होता . आजी आपल्या नातवंडास झाडावर किलबिलणारी पाखरे दाखवत होती. तर कधी झाडावरील कैऱ्या पाहून नातू टाळया वाजवत होता त्याचा आनंद ओसंडून वाहत होता. शहरी माणसे मोठी हुशार व लबाड या जंगलाच्या सौंदर्याचा मोह पाडत.आजूबाजूच्या जागांच्या किमती गगनाला भिडल्या होत्या या जंगलाभोवती माणसाच्या घरटयांनी गर्दी केली होती.

पण एक दिवस काय झाले? काही सुशिक्षितांच्या डोक्यात आपल्या स्वार्थाच्या कल्पना आल्या आणि ही कल्पना सत्यात उतरवायला काही क्रूर हात समोर आले एका रात्रीत दोनशे झाडांची कत्तल झाली. झोपेतून जाग्या झालेल्या माणसांना सांगण्यात आले आता तुमच्यासाठी जंगलातून एक रस्ता तयार होणार आहे. आता मुख्य रस्त्यापर्यंत आपल्याला एक तास नाही तर फक्त पंधरा मिनिटं लागणार आहेत. आपला प्रवास सुखाचा होणार आहे.मित्रांनो आता जंगल नावाला राहिले आहे. आता आजीबरोबर नातू येथे येत नाही.अनेक उध्वस्त घरटी आणि पाखरांचा आक्रोश येथे मन हेलावून टाकतो .आजूबाजूच्या घरटयातली माणसे आता मूक झाली आहेत. कारण त्यांच्याच माणसांनी सुख वाटता–वाटता त्यांचे खरे सुख हिरावले आहे.सुशिक्षित माणसाच्या सुखाच्या कल्पना माणसाला आणि पुढच्या पिढीला कोठे नेणार आहेत? माणसे का अशी सुखाची व्याख्या बदलतात?

**प्र 1 (अ) खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा (कोणतेही तीन)** (3X1=3)

1 जंगलातील झाडांच्या फांदया कशा होत्या?

**अ** जमिनीकडे झुकलेल्या

**ब** आकाशाकडे झेपावणाऱ्या

**क** वाऱ्यावर डोलणाऱ्या

**ड** हिरव्यागार आणि उंच

2 जंगलात पक्ष्यांचे कसे संगीत ऐकायला मिळे?

**अ** गोड

**ब** सुश्राव्य

**क** मधुर

**ड** आनंदित

3 शहरातून फिरणाऱ्या लोकांना जंगल काय देत असे?

**अ** ऊर्जा

**ब** शांतता

**क** संपत्ती

**ड** पाऊस

4 कुठल्या गोष्टी मन हेलावून टाकतात ?

**अ** माणसाची हुशारी व लबाडी

**ब** माणसाच्या स्वार्थाच्या कल्पना

**क** उध्वस्त घरटी आणि पाखरांचा आक्रोश

**ड** माणसाच्या सुखाच्या कल्पना

**प्र 1 (ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :–(कोणतेही तीन)** **(3X1=3)**

1 जंगलात कोण आनंद सोहळा साजरा करत असत?

2 जंगलातील प्राण्यांनी कोणता नियम पाळला होता ?

3 रस्त्यावरील लोंकांना कशाचे वेड लागे ?

4 उताऱ्यात शहरी माणसाचा उल्लेख कसा केला आहे ?

**प्र 1(क) उताऱ्याच्या आधारे खालील प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा :–(कोणताही एक)** **(1X2=2)**

1 एकदा जंगलात काय झाले ?

2 माणसाच्या सुखाच्या कल्पना बदलल्यामुळे काय झाले ?

**प्र 2:– (आकलन ) अः– अपठित पद्यांश**

नको मंदिरे,नको मशिदी,नको चर्च वा गुरुद्वारा,
मनामनातून वाहत राहो मानवतेचा शीतल वारा ।।
धर्मांहूनही श्रेष्ठ आम्हांला कर्मावरची अपार भक्ती
कष्टावरती निष्ठा आमची ऐक्यभावना ही तर शक्ती
अज्ञानाच्या अंधाराला मुळीच नाही जनात थारा।।
विज्ञानाच्या वाटेवरती चालत राहू सदैव सारे
हाती येतील प्रकाशवर्षे,गूढ चांदण्या दूरस्थ तारे
संवादाचा पूल उभारू गाडून टाकू मौन मनोरा ।।
माणूस ही तर जात आमुची,माणुसकी हा धर्म आमचा
दुसऱ्यासाठी त्याग समर्पण जोडू धागा परंपरेचा
सजीव सृष्टी विशाल इथली एकच कर्ता उभारणारा।।

**प्र 2 (अ) खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा :–** **(3X1=3)**

1 वरील कवितेतून आपल्याला कोणता संदेश देण्यात आला आहे?

**अ** मानवी जीवन

**ब** मानवाची जीवनशैली

**क** धर्म आणि पंथ

**ड** सर्वधर्मसमभाव,ऐक्यभावना,सर्वजण एकच आहेत

2 विज्ञानाच्या वाटेवरून चालत राहिल्यावर काय होईल?

**अ** माणुसकीचा धर्म निर्माण होईल

**ब** संशोधन होईल

**क** हाती येतील प्रकाशवर्षे,प्रगती होईल

**ड** एकमेकाबद्दल आपुलकी निर्माण होई

3 कवितेवरून पुढीलपैकी कोणता पर्याय असत्य आहे?

**अ** सर्वांना माणुसकी पेक्षा धर्म मोठा वाटला पाहिजे.

**ब** सृष्टीचा निर्माणकर्ता एकच आहे हे आपण समजले पाहिजे

**क** विज्ञानाच्या वाटेवरून जावे.

**ड** परोपकारी मनोवृत्ती हाच परंपरेचा धागा आहे.

**प्र 2 (ब) एका वाक्यात उत्तरे लिहा :–** **(4X1=4)**

1 वरील कवितेत कोणता धर्म व जात सांगितली आहे?

2 मनामनातून काय वाहत राहावे असे कवी म्हणतात?

3 धर्मापेक्षा काय श्रेष्ठ आहे असे कवी म्हणतात?

4 कवींना काय गाडून टाकायचे आहे ?

**विभाग :– ब ( 20 गुण)**

**प्र 3 (अ) सुचनेनुसार प्रश्न सोडवा:– (कोणतेही चार)** **(4X1=4)**

1 मानसाने संघर्षातही जगण्याचा प्रयत्न करावा. (आधोरेखित शब्दाची जात ओळखा.)

**अ** सर्वनाम

**ब** सामान्यनाम

**क** नाम

**ड** विशेष नाम

2 बापरे! किती भयानक हा अपघात! ( केवलप्रयोगी अव्यय ओळखा)

**अ** किती

**ब** बापरे

**क** भयानक

**ड** हा

3 शाळेमध्ये अभ्यासू विदयार्थी आहेत. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

**अ** क्रियाविशेषण अव्यय

**ब** विशेषण

**क** शब्दयोगी अव्यय

**ड** सर्वनाम

4 मुलांनी काल मैदानावर खूप खेळ खेळला. ( क्रियाविशेषण अव्यय ओळखा)

**अ** काल

**ब** खूप

**क** मैदान

**ड** मुले

5 आई आली व तिने स्वयंपाक केला. ( आधोरेखित शब्दाची जात ओळखा)

**अ** विशेषण

**ब** उभयान्वी अव्यय

**क** क्रियाविशेषण अव्यय

**ड** अलंकार

**प्र 3 (ब) काळ ओळखा व बदला ( कोणतेही तीन)** **(3X1=3)**

1 सरला निबंध लिहित होती .( काळ ओळखा).

2 प्रदिपने भाषण केले असेल. ( या वाक्याचे वर्तमानकाळी वाक्य करा)

3 मिथिला नगरीचे रामराजे काल सकाळपासून चिंतेत आहे . ( भूतकाळ करा )

4 काठी रात्री दोन इचांनी वाढणार .(काळ ओळखा)

**प्र 3 (क) वाक्याचे प्रकार ओळखा ( कोणतेही तीन)** **(3X1=3)**

1 किती छान आहे ताजमहल !

2 राधा मावशींचे पाय स्वच्छ आहेत. ( नकारार्थी करा )

3 तुम्ही आतापर्यंत किती झाडे लावली ?

4 राष्ट्रगीताचा मान राखा.

**प्र 3 (ड) समानार्थी शब्द ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 विदयुत

2 चाक

3 थट्टा

**प्र 4 (अ) विरुध्दार्थी शब्द ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 महागडा

2 खरेदी

3 जुना

**प्र 4 (ब) लिंग बदला ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 विदयार्थी

2 उंदीर

3 थोरला

**प्र 4 (क) वचन बदला ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 रंग

2 पंखा

3 शोध

**प्र 4 (ड) समास ओळखा ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 भाजीपाला

2 नवरात्री

3 यथाशक्ती

**विभाग–क पाठयपुस्तक आधारित (30 गुण)**

**प्र 5 (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही तीन)** **(3X1=3)**

1 दिव्याच्या शोधाला पन्नास वर्षे केव्हा पूर्ण झाली ?

2 सखू आजी मुलांना कोणत्या गोष्टी सांगे?

3 पहिली आगगाडी कोणत्या दिवशी रूळावरून धावली?

4 शिरीष आपल्या वडिलांना कोणत्या नावाने हाक मारीत असे?

**प्र 5 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा (कोणतेही तीन)** **(3X1=3)**

1 माझे नाव शिरीष भागवत घरी ———— च म्हणतात.

2 इंजिनावर अंग्रेजांचे मोठे ———— फडकत होते.

3 ऑलिंपिक सामने दर —————— वर्षांनी होतात.

4 —————— ऋतूचे दिवस होते.

**प्र 5 कः— खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहाः—** **(1X3=3)**

1 तुम्हाला समजलेले सखूआजीचे व्यक्तिचित्र रेखाटा—

2 ऑलिंपिक म्हणजे विश्वबंधुत्व ही संकल्पना स्पस्ट कराः—

3 तुमच्या मते रेल्वेचे असलेले फायदे व तोटे सविस्तर लिहाः—

**प्र 5 ङः— वाक्प्रचारांचा योग्य वापर करून वाक्य पुन्हा लिहा :—** **(5X1=5)**

**(गलका <u>करणे/पत्ता</u> <u>नसणे/आ</u> वासून उभे राहणे,खटाटोप करणे,प्रशंसा करणे )**

1 ओवेन्सचा वर्ण,त्याचा देश हे सगळे विसरून जगाने त्याचे कौतुक केले.

2 दिव्याचा झगमगाट पाहून सर्वजण आश्चर्यचकित झाले.

3 ऐन पावसाळयात पाऊसच गायब झाला.

4 शिक्षक वर्गात नसल्याने मुलांनी वर्गात गोंधळ केला.

5 चांगले गुण मिळविण्यासाठी पृथ्वीने खूप प्रयत्न केला .

**प्र 6 अ :— (अ) एका वाक्यात उत्तरे लिहाः— ( कोणतेही चार )** **(4X1=4)**

1 वारकरी संप्रदायाचे कळस कोण झाले?

2 संतकृपा झाली अभंगाचे संपादक कोण आहेत?

3 व्यायाम केल्याने कोणती शक्ती वाढते?

4 माणसाचा सर्वात मोठा वैरी कवितेत कोणाला म्हटले आहे?

5 व्यायामाशिवाय सात्त्विक भोजन कसे होते?

**प्र 6 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :—(कोणतेही चार)** **(4X1=4)**

1 व्यायामे ——————जाई दूरी.

2 व्यायाम —————— मित्र.

3 ———— म्हणे फडकती ध्वजा.

4 संतकृपा झाली —————— फळा आली.

5 ——————— तयाचा किंकर.

**प्र 6 क) खालील काव्यपंक्तींचे संदर्भासहित स्पष्टीकरण कराः—(कोणतेही एक)** **(1X3=3)**

1 ज्ञानदेवे रचिला पाया।
उभारिलें देवालया।।1।।
जनार्दन एकनाथ।
खांब दिधला भागवत।।2।।

**किंवा**

व्यायामाने सशक्त स्नायू। व्यायामे मानव होई दीर्घायु ।
व्यायामाहीन पित्त,कफ,वात। जर्जर करिती अत्यंत।।

**प्र 7 अ स्थूलवाचन :— एका वाक्यात उत्तरे लिहा :— ( कोणतेही तीन )** **(3X1=3)**

1 जंगलात फिरण्यासाठी असलेल्या हत्तीणीचे नाव काय होते?

2 ढगाला संस्कृत भाषेत काय म्हणतात?

3 पुच्छविहीन वानराचे नाव काय होते ?

**प्र 7 (ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर 40ते 50 शब्दात लिहा :–** **(1X2=2)**

1 काझीरंगा ही कर्दम भूमी आहे हे विधान सोदाहरण स्पष्ट करा?

2 प्राण्यांचे गंधज्ञान या संकल्पनेबाबत तुमचे मत लिहा–

## विभाग– ड लेखन– (गुण 15)
## लेखन

**प्र 8 अ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा :–** **(1X6=6)**

**1 आमच्या शाळेतील कीडादिन**

मुद्देः– मुलांसाठी उत्साहाचा दिन––विविध खेळांचे आयोजन –– विदयार्थ्यांमध्ये जिंकण्यासाठी चुरस–पालकांना झालेला आनंद––विजेत्यांचे सर्वाकडून झालेले कौतुक .

**2 पुस्तक एक खरा मित्र ......**

मुद्दे :– पुस्तकांचे आपल्या जीवनातील स्थान–– प्रेरणा देणे ––– शब्दशक्ती वाढविणे ––– खरा निःस्वार्थी मित्र –––कायम साथ देणारा––समाजमन घडवण्यात पुस्तकांचा वाटा

**3 पडक्या किल्याचे मनोगत**

मुद्दे :– पूर्वी असलेले महत्त्व ––– विविध किल्ले ––– जोपासना–––आजची स्थिती... खंत ....परिणाम.

**प्र 8 (ब) मुद्दयावर आधारित गोष्ट लिहा. (शीर्षक आणि तात्पर्य आवश्यक)** **(1X5=5)**

एक गरीब माणूस–– कोंबडया पाळतो–––एक विचित्र कोंबडी––– सोन्याचे अंडे देणारी–––लोभ वाढणे––एकदम श्रीमंत होण्याची इच्छा ––कोंबडी कापणे––एकही अंडे न मिळणे–––पश्चाताप–––तात्पर्य .

**किंवा**

एक शिकारी ––शेतात जाळे––कबुतरांचा थवा ––शेतातील दाणे टिपणे –––जाळयात अडकणे––प्रमुखाचा सल्ला –––जाळे घेऊन उडा –––कबुतरांचे जाळयासहित उड्डाण –––सुटका –––तात्पर्य.

**प्र 8 (क) पत्र लेखन :– ( कोणतेही एक )** **(1X4=4)**

तुम्ही राधा/रमन कुलकर्णी, गांधी मार्ग,सोमवार पेठ,पुणे–404430,रहिवाशी आहे.तुमच्या भागातील वीज वारंवार खंडित होत असल्यामुळे वीज वितरण मंडळास तक्रार पत्र लिहा.

**किंवा**

वनिता/विनय पाटील, विदयानिकेतन विदयालय,सोलापूर येथून शाळेच्या प्रयोगशाळेसाठी साहित्य मागविणारे पत्र दुर्गा साहित्य भंडारा,टिळक मार्ग,कोल्हापूर यांना पत्र लिहा :–

============= यशासाठी शुभेच्छा ===============